# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 30/08/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील मौजा मोहपा फाटा चौक येथे दिनांक 29/08/2021 चे 03.30 वा. ते 04.45 वा. दरम्यान आरापी क. 1) दिनेश जानबाजी आडमाची, वय 29 वर्ष, 2) बंसीधर उर्फ रेवलाल वरठी, वय 26 वर्ष, दोन्ही रा. यशवंतबाबा झोपडपटटी सावनेर, 3) सुरेश उर्फ पांडुरंग नारनवरे, वय 29 वर्ष, रा. दत्त मंदीर जवळ पाटणसावंगी, 4) मोन्टु रामचंद्र बारई, रा. यशवंतबाबा झोपडपटटी सावनेर व 5) रामराव भैय्याजी भोयर, रा. जुना धान्य गंज सावनेर हे दरोडा घालण्याची पुर्व तयारी करून सोबत मिरची पुड, दोर, लोखंडी, रॉड स्वता जवळ बाळगुन रात्रीच्या अंधारात संशयास्पदरित्या एकत्र जमलेले फिर्यादींना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस उपनिरीक्षक श्री सागर कारंडे पोस्टे सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 399 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सागर कारंडे मो.नं. 7722011228 हे करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 32 कि. मी अंतरावर मौजा उंद्री बाजार येथे दरम्यान दि. 29/08/2021 चे 20.00 वा. आरोपी नामे– संजय श्रीराम भगत, वय 33 वर्ष, रा. उंद्री याने फिर्यादी नामे– साईनाथ नारायणराव पानसोक वय 38 वर्ष रा.पाचगांव यांच्या कडुन 30 रू ची भाजी खरेदी केली व पैसे न देता तेथेच उभा असतांना दुसऱ्या ग्राहकाने 10 रू ची भाजी फिर्यादी कडुन खरेदी केली. त्या ग्राहकाचे 10 रू. घेवुन आरोपीने फिर्यादीला दिले व फिर्यादी यास मी, "तुला 100 रू दिले मला 70 रू परत दे" असे म्हणुन शिवीगाळ करून वाद घातला. यानंतर आरोपीने तेथुन घरी जावुन कोयता आणुन फिर्यादीस हातावर, दंडावर व डोक्यावर कोयत्याचा बोथट बाजुने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडावले 9763234548 या करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मौजा उमरी येथे दिनांक 27/08/2021 चे 19.00 वा. ते 28/08/2021 चे 07.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– सुनिल शेषराव बोबडे, वय 42 वर्ष, रा. वार्ड 3 उमरी ता. सावनेर यांनी आपली स्वताची एम.एच–40/एई– 0912 क्रमांकाची स्प्लेंडर मोटरसायकल आपले घरामोर कंपाउंडच्या आत उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 25,000/–रू. चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामराव पवार 7875983360 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर